# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in

अतितात्काळ
कालमर्यादीत दि. २८/६/२०१९ पर्यंत

जा. क्र. १०/एनजीपी/विद्यार्थी स्थलांतरण /२०१९/ ६७०
दिनांक : 20 JUN 2019

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, शासकीय अनुदानित व
विद्यापीठ व्यवस्थापित संस्था.
(अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र इ. पदविका संस्था)
(स्वायत्त संस्था वगळून)

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये शासकीय व शासन अनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र इ. पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या व दुसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ:-१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.मान्यता-२०१९/(प्र.क्र ७७/१९) तांशि-५, दिनाक १७ मे २०१९
२) शैक्षणिक वर्ष २०१९-२० पोस्ट एस.एस.सी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रवेश नियमावली

संचालनालयाच्या अधिपत्याखालील पुर्णवेळ पदविका पाठ्यक्रमांच्या प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षाचे (अभियात्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र व हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरींग टेक्नॉलॉजी) नियम संदर्भ क्रमांक २ अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयानुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय / अशासकीय अनुदानित व विद्यापीठ संचालित शैक्षणिक संस्थांमधील पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नियम लागू केलेले आहेत. त्यानुसार शासकीय व शासन अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र या पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या संस्था बदल, शाखा बदल इ. बाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

१. प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर ,पाठयक्रम किंवा पाळी बदलण्याची विनंती करणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांना जागांच्या उपलब्धतेच्या अधीन राहून त्याच संस्थेत तसे बदल करण्याची तरतूद असून सदर बदल प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे करावयाचे आहेत. तरी, आपल्या संस्थेतील ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षानंतर पाठयक्रम / पाळी बदलाकरीता अर्ज /विनंती केली आहे अशा विद्यार्थ्यांना जागांच्या उपलब्धतेनुसार प्रथम वर्षातील गुणवत्तेच्या आधारे प्राधान्य निश्चित करून आपले स्तरावरुन (संस्था स्तरावरुन) नियमाचे काटेकोरपणे पालन करुन मान्यतेची कार्यवाही करावी.

२. एका शासकीय, शासन अनुदानित व विद्यापीठ संचलित तंत्रनिकेतनातून दुस-या शासकीय, शासन अनुदानित व विद्यापीठ संचलित तंत्रनिकेतनामध्ये पहिल्या व व्दितीय वर्षानंतर संस्था बदलाची तरतूद करण्यात आलेली आहे. म्हणून आपल्या महाविद्यालयातील जे विद्यार्थी इतर शासकीय व शासन अनुदानित संस्थेत (स्वायत्त संस्था वगळून) बदलीसाठी इच्छुक आहेत, अशा विद्यार्थ्यांना संदर्भ क्रमांक २ मधील बदलीबाबतचे नियम निदर्शनास आणून दयावेत. आपल्या संस्थेतील जे विदयार्थी इतर शासकीय व शासकीय अनुदानित संस्थेत बदलीसाठी आपणाकडे अर्ज करतील अशा सर्व विद्यार्थ्यांची बदली बाबत त्यांनी दिलेली कारणे (वैद्यकीय, आर्थिक अडचण, वडिलांची/पालकांची बदली इत्यादी) नमूद करुन

शिफारशी दि.२६/६/२०१९ पर्यंत या संचालनालयास सादर करण्यांत याव्यात. तसेच desk10@dtemaharashtra.gov.in या ई-मेल वर सदर माहितीची Soft copy सुध्दा उपलब्ध करून द्यावी.

३. अ.क्र. २ नुसार विद्यार्थ्यांचे संस्था बदलाचे प्रस्ताव सादर करतांना या पत्रासोबतच्या "Annexure A" च्या नमुन्यात विद्यार्थ्यांचा विनंती अर्ज, गुणपत्रिकांची साक्षांकीत प्रत,पाठयक्रम बदल असल्यास महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे पात्रता प्रमाणपत्र, शिक्षणात खंड असल्यास त्याबाबत प्राचार्यांचे प्रमाणपत्र किंवा रु. १००/- च्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र, प्रथम वर्ष किंवा द्वितीय वर्ष प्रवेशाचे ॲलॉटमेंट लेटर (उपलब्ध असल्यास) व संस्था बदलीच्या कारणाच्या पुष्ठर्थ पुरावे, इ. दस्तावेज सादर करावीत

४. विद्यार्थ्यांना, कोणत्याही टप्प्यावर स्वायत्त संस्थामध्ये संस्थाबदल अनुज्ञेय नाही अशी स्पष्ट तरतूद संदर्भ क्रमांक २ अन्वये निर्धारीत केलेल्या नियमात असल्याची बाब संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी व असे अर्ज आपल्या स्तरावरुन निकाली काढण्यात यावेत.

५. अधिसंख्य कोटयातील ( Supernumerary Quota seats )जागे अंतर्गत प्रवेश देण्यात आलेले विद्यार्थी हे पाठयक्रम किंवा संस्था बदलण्यासाठी पात्र असणार नाहीत.

६. बदली मागितलेल्या विद्यार्थ्यांस या संचालनालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतरच लिव्हींग सर्टीफीकेट द्यावे व कोणत्याही परिस्थितीत तत्पुर्वी ते देण्यात येवू नये. तसेच संबंधित विद्यार्थ्याचा संस्था बदलीसाठी केवळ ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केल्याच्या कारणास्तव त्यांचे संस्थेतील प्रवेश रद्द करु नये. तसेच संस्थेतील सर्व बदली इच्छुक विद्यार्थ्यांची गुणवत्तेच्याक्रमाने यादी तयार करतांना सदरहू विद्यार्थ्याच्या प्रवेशाचा प्रकार सुपरन्युमरी कोटयातील आहे किंवा कसे? याच्या तपशीलासह व आपल्या शिफारशीसह या कार्यालयास सादर करावी व या संदर्भात कोणत्याही विद्यार्थी व पालकांस संचालनालयास संपर्क साधण्यास सूचित करू नये.

येथे असेही नमूद करण्यात येते की, समर्पक कारणे व आपल्या ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय विद्यार्थ्यांच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही करण्यांत येणार नाही. विद्यार्थी ज्या संस्थेत व अभ्यासक्रमात शिकत आहे व ज्या संस्थेत बदली मागितलेली आहे. त्या संस्थेच्या नांवासमोर इन्स्टीटयुट कोड, अभ्यासक्रमाचे नांव व कोर्स कोड नमूद करण्यांत यावा.तसेच याबाबतची माहिती आपल्या शिफारशीसह निश्चितपणे दि.२६/६/२०१९ पर्यंत या संचालनालयास प्राप्त होईल अशा बेताने पाठवावी, तद्नंतर आलेल्या प्रकरणांचा व माहितीचा विचार करण्यात येणार नाही. अशी प्रकरणे दप्तरी दाखल केली जातील याची नोंद घ्यावी.

( डॉ. अभय वाघ )
संचालक,
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित

पृष्ठांकन क्रं./तंशिस/विकाना/शैवि/पदविका/2019/1859
दिनांक:- 21 JUN 2019

प्रति,

प्राचार्य
सर्व शासकीय व शासन अनुदानित पदविका संस्था
नागपूर विभाग, नागपूर

नागपूर विभागातील शासकीय व शासन अनुदानित पदविका संस्थानी उपरोक्त् पत्रात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ.चंद्रशेखर थोरात)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर

## APPLICATION FORMAT FOR ADMISSION BY TRANSFER

1. Name of the Student (In Full) ..............................
2. Address for Correspondence with Pin Code and Telephone Number : ..............................
3. Institute and Semester where Currently Studying : ..............................
4. Details of the Result of Last Exams

| Branch | Year/ Semester | Year of Passing | Summer/ Winter | Full pass /pass with one ATKT | Percentage |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |

5. Institute where admission by transfer is sought: ..............................
6. Branch & Year /Semester in which admission: Branch.............................. Year/Semester.............. is sought.
7. Reason for asking the transfer of Institutes and Change of branch (if any):

..............................

..............................

I the undersigned state that the information stated above is true to my knowledge and belief. I am fully aware that transfer / change of institute / branch is not a right and if is upto the authority to decide my case on the basis of its merit.

Date :

Signature of Student

Documents attached:

1. All Marksheets.
2. NOC's .
3. 1st year Admission receipt.
4. Document related to reason for asking transfer etc